स्थापना
१ मे १९५७

# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे – ४११०३७
www.puneapmc.org / Email : kubspune37@rediffmail.com

जा.क्र.प्रशा/लेखा/कर सल्लागार/ प्रसिध्दीपत्रक/ २२६ /२०२६-२७ दि.०५/०५/२०२६

## प्रसिध्दी पत्रक

**विषय** :- कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे व कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे पेट्रोल पंप चे सन २०२६-२७ या आर्थिक वर्ष कालावधीचे टॅक्स ऑडीट, जी.एस.टी ऑडीट (GSTR९ व ९C) करणे तसेच जी.एस.टी ची मासिक व वार्षिक विवरणपत्रके इ. संबंधित कार्यालयाकडे दाखल करणे कामाचे दरपत्रके सादर करणेबाबत.

वरील विषयास अनुसरून सर्व सनदी लेखापाल यांना कळविणेत येते की, कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेचे व पेट्रोल पंप विभागाचे सन २०२६-२७ कालावधीचे टॅक्स ऑडिट, जी.एस.टी ऑडीट (GSTR९ व ९C) करणे, जी.एस.टी मासिक व वार्षिक विवरणपत्रके संबंधित कार्यालयाकडे दाखल करणे , कायदयाअंतर्गत येणारी विविध रजिस्ट्रेशन्स व व इतर कायदेसंलग्न कामे करून घेणेकामी सनदी लेखापालांची नेमणुक करणेकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदर कामे करणेकामी खालील नियम व अटींचे अधीन राहून आपले कमीत कमी दराचे दरपत्रके सिलबंद पाकीटमध्ये दिनांक ११/०५/२०२६ अखेर दु. १.०० वाजेपावेतो संस्थेच्या मुख्य कार्यालयातील लेखा विभागामध्ये पोहोच करावे.

**कामकाजाचे स्वरूप, नियम व अटी :-**

१. सन २०२६-२७ आर्थिक वर्ष कालावधीचे टॅक्स ऑडीट, जी.एस.टी ऑडीट (GSTR-९, ९C) करणे, दरमहा जी.एस.टी. (GSTR१, GSTR२-२ B, GSTR३B, GSTR७) इ. सर्व प्रकारची विवरण पत्रके दाखल करणे. (संस्थेचे दोन जी.एस.टी. नंबर आहेत. १. कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे २. कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे पेट्रोल पंप)
२. इनकम टॅक्स, जी.एस.टी, कार्यालयाकडील पत्रांची व नोटीसांची पुर्तता करणे तसेच कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन करणे.
३. इनकम टॅक्स, जीएसटी कायदयाअंतर्गत येणारी विविध रजिस्ट्रेशन्स व इतर कायदेसंलग्न कामे करणे.
४. सादर केलेली विवरण पत्रके, टॅली सॉफ्टवेअर डेटा असेसमेंट स्क्रुटीनी करून घेणे.
५. शासन / विभाग / लेखापरीक्षण कार्यालय यांनी मागितलेल्या माहितीचे प्रमाणन करणे.
६. सदर कामाचा कालावधी दिनांक १/०४/२०२६ ते दिनांक ३१/०३/२०२७ इतका असेल.
७. आर्थिक वर्ष निहाय फी अदा करणेचा पहिला टप्पा –इनकम टॅक्स विवरण पत्रके, टॅक्स ऑडीट रिपोर्ट इ. आयकर कार्यालयात सादर केलेनंतर ५० टक्के फी रक्कम अदा करणेत येईल.
८. आर्थिक वर्ष निहाय फी अदा करणेचा दुसरा टप्पा – वरील कामाची असेसमेंट स्क्रुटीनी पुर्ण झालेनंतर उर्वरित ५० टक्के फी रक्कम अदा करण्यात येईल.
९. आर्थिक वर्ष निहाय जी.एस.टी विषयक मासिक व वार्षिक विवरण पत्रके दाखल करणे कामाची फी ची रक्कम दोन समान हप्त्यामध्ये रक्कम अदा करणेत येईल.
१०. दरपत्रक सादर करताना उपरोक्त नमूद केलेप्रमाणे प्रत्येक कामाचे वेगवेगळे मूळ दर अधिक जी.एस.टी याप्रमाणे दर नमूद करावेत.
११. दरपत्रकामध्ये फर्मचा जी.एस.टी क्रमांक, पत्ता, दुरध्वनी क्रमांक नमूद करावा.
१२. नियम व अटी मान्य असणाऱ्या सनदी लेखापालांनीच दरपत्रके सादर करावीत.
१३. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. ११/०५/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयात उघडण्यात येतील. दरपत्रके उघडणेचे वेळेत बदल झालेस दुरध्वनीव्दारे कळविणेत येईल याची नोंद घ्यावी.

सचिव
कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

फोन : +९१ २० २४२६०२०३/२४२६२३४९/२४२७२८८७